११

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

संग्रहालय क्रमांक
११२

लेखक कृष्णराव नानाजी
डास्मोडकर

पुस्तकाचें नांव नीतिसौंदर्य

सन

११२

# नीतिसौंदर्य

## निबंध

# नीतिसौंदर्य.

हें पुस्तक,

"ब्यूटीज ऑफ मेरी कॉरीली"

ह्या इंग्रेजी पुस्तकाच्या आधारानें

कृष्णराव नानाजी अस्नोडकर

यांनीं लिहिलें,

तें

मुंबईंत,

'निर्णयसागर' छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

सन १८९९.

किंमत ४ आणे.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें हें पुस्तक नोंदून त्यासंबंधीं
सर्व हक्क मालकानें आपणाकडे ठेविले आहेत.

# कृतज्ञतापूर्वक आभार.

ज्या व्यक्तीच्या निरपेक्ष उदार आश्रयानें हें पुस्तक मला प्रसिद्ध करण्यास सामर्थ्य आलें, त्या व्यक्तीला जगदीश चिरकाल पूर्ण सौख्य देवो.

पुस्तककर्ता.

कृष्णराव ना० अस्नोडकर.

# समर्पण

महाराष्ट्र लेखनमुकुटमणि बहुसन्माननीय
रावसाहेब विनायक कोंडदेव ओक
माजी अ. डे. ए. इन्स्पेक्टर,

यांस

त्यांचें अलौकिक लेखनचातुर्य, महाराष्ट्रभाषेविषयीं उत्कंठा,
थोर अंतःकरण, परोपकारबुद्धि, सौजन्य, सर्वसमान-
दृष्टि, बांधवांविषयीं कळकळ व जगदीशचरणीं
निष्ठा इत्यादि अमोलिक गुण जाणून,
त्यांच्या चरणीं
हें पुष्प
अर्पण केलें असे.

पुस्तककर्ता.

# प्रस्तावना.

विद्येची अभिरुचि नसणें, ह्मणजे केवळ पशुत्व आहे. ज्याच्या आंगी विद्या नाहीं, त्याचें जीवित्व रानांतील शुष्क एरंडासारखें धरित्रीला भारभूत आहे. असा मनुष्य असून नसून सारखाच. एखादा कुबेरपति जरी असला, तरी त्याचें वैभव ह्मणजे काजव्याप्रमाणें आहे. कारण, **स्वदेशे पूज्यते राजा । विद्वान् सर्वत्र पूज्यते ।** ह्मणून प्रत्येकानें विद्याभ्यासंगाकडे जितका आपला अमोल्य वेळ लाववेल तितका तो लावीत असावा. खरोखर विद्येसारखी दुसरी संपत्ति नाहीं. विद्येसारखी चित्ताचें आकर्षण करून मनाला आल्हाद देणारी, दुसरी मनोरम वस्तु नाहीं. विद्येसारखा दुःखसमयीं, मनाचें सांत्वन करणारा, दुसरा सुमित्र नाहीं. प्रत्येक कार्यीं मनाला उत्तेजन देऊन, संकटसागरांतून पार पाडण्याकरितां युक्ति सुचविणारा, दुसरा मंत्री नाहीं. एकंदरींत विद्येचा प्रभाव आज अनादिकालापासून जे महान् पुरुष गात आले आहेत तो खरोखरच वंद्य आहे. विद्यार्जनाचे चार प्रकार आहेत. वाचन, श्रवण, अध्यायन व मनन. दयाळू इंग्लिशछत्राच्या छायेखालीं मुद्रणकलेचा प्रसार दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्यामुळें पाहिजे त्याला आपले लहान थोर विचार, भूपृष्ठाच्या वाटेल त्या भागावर फैलावतां येतात. हा दयाळू सरकाराचा आह्मांवर कितीतरी थोर उपकार आहे ?

ज्याप्रमाणें घर बांधितेवेळीं प्रथमतः त्या घराच्या रचनेचें चित्र रंगवावें लागतें, नंतर त्याच्या रचनार्थ कोणकोणतें सामान लागेल, त्या सर्वांची सिद्धता करावी लागते, तद्वतच ग्रंथलेखकांचें आहे. कोणताही ग्रंथ लिहावयाचा ह्मटला ह्मणजे ज्या भाषेंत तो लिहावयाचा असेल, तिचें ज्ञान चांगलें असलें पाहिजे; लोकाभिरुचीस कितीसा पात्र ठरेल ह्याविषयीं मनाची पूर्ण खात्री झाली पाहिजे; बीभत्स कुत्सितपणा, निंदा व शुष्क

पाल्हाळ कितीसा टाळला गेला आहे, हें जाणण्याचें आंगीं सामर्थ्य असलें पाहिजे. विषय सरस असून भाषासरणी सरळ व मधुर असली पाहिजे. ही चांगल्या ग्रंथकारांची गोष्ट झाली. परंतु बागवगीचे, माड्यांच्या हवेल्या बांधण्याचें आंगीं सामर्थ्य नसलें ह्मणून एखादी खोपटी बांधूं नये कीं काय? कारण "दगडापेक्षां वीट मऊ" या न्यायानें हातपाय लांबवून स्वस्थ पडण्यापेक्षां कांहीं तरी यत्न करणें फार चांगलें, या गोष्टीकडे लक्ष देऊन, मीं हा अल्प यत्न केला आहे. "नीतिसौंदर्य" हें पुस्तक मीं इंग्रेजी "ब्यूटीज ऑफ मेरी कॉरीली" या पुस्तकाच्या आधारें लिहिलें आहे. ह्या पुस्तकांत बोधपर लहान मोठे उतारे देऊन थोडक्यांत चांगलें निरूपण केलें आहे. ह्याच्या वाचनानें मनाला बरीच शांति व बोध होण्याची फार आशा आहे. खरोखर "मेरी कॉरीली" ही बाई असून तिनें असे कांहीं अप्रतिम ग्रंथ लिहिले आहेत कीं, ग्लाडस्टनसारख्या थोर पुरुषानें सुद्धां तिला धन्यवाद दिले आहेत. त्यांपैकीं ग्लाडस्टनसाहेबांचा एक उतारा वाचकांच्या समाधानाकरितां इंग्रेजांत दुसरीकडे दिला आहे. तो वाचल्यावर तिच्या थोरपणा–विषयीं खात्री होईल. आधीं इंग्रेजी भाषा कठिण, त्यांत तिला मराठी भाषेचें स्वरूप देणें, ह्मणजे माझ्या सारख्या कोत्या व अल्पबुद्धीच्या मनुष्याला तर फारच कठिण, परंतु, "यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोत्र दोषः" हें वाक्य ध्यानांत आणून मीं हा अल्प यत्न केला आहे, आणि हा सज्जनांच्या आदरास पात्र व्हावा अशी फार आशा आहे. ती माझी दृढाशा सफळ झाल्यास मी धन्य होईन.

हें पुस्तक लिहितांना ज्या माझ्या एका मित्रानें मला कांहीं उपयुक्त सूचना केल्या त्याचा मी फार फार आभारी आहें.

२० आगष्ट १८९९,<br>
मुंबई.

पुस्तककर्ता.

"Because I was curious to see for myself the personality of a young woman who could write so courageously and well, and in whose work I recognise a power working for good, and eminently calculated to sway the thoughts of the people. It is a wonderful gift you have......There is a magnetism in your pen which will influence many."

W. E. GLADSTONE.

# नीतिसौंदर्य.

**मधुर गायन.**

मधुर गायन ह्मणजे मनोविकारांना जागृत करणारें साधन आहे.

**विद्या.**

पदवीला विद्या भूषणास्पद आहे परंतु विद्येला पदवी भूषणावह होत नाहीं.

**प्रशंसा.**

ज्या स्त्रिया सद्गुणी असतात त्यांना लोकांनीं केलेली प्रशंसा मुळींच आवडत नाहीं; परंतु ज्या वाईट चालीच्या असतात, त्या स्वतःच आपली प्रशंसा करून घेतात.

**खरे स्नेही.**

खरोखरच आडमार्गांतून जाणाऱ्यांना जे सावध करितात, त्या महात्म्यांना कधींही कोणी फारसें महत्व देत नसतो. परंतु, त्यांची खरी योग्यता जाणण्याचें जर आंगीं सामर्थ्य असेल, तर तेच खरे स्नेही वाटतात.

आळ.

कोणीं कोणाची निंदा केली असतां तीवर विश्वास ठेवण्यापूर्वीं तीविषयीं मनाची खात्री करून घेतली पाहिजे. कारण, सद्गुणांवर नेहमीं आळ येत असतो.

बुद्धि.

बुद्धिवान् मनुष्याच्या शहाणपणापुढें पदवीचें मुळींच महत्व नसतें. सार्वभौम राजापेक्षां विद्वानच सर्व ठिकाणीं पूज्यता पावतो.

आत्मा.

ज्याला प्राण असें ह्मणतात, तोच रक्ताला रंग चढवितो, ज्ञानतंतूंना वृद्धिंगत करितो, व दृष्टीला प्रकाशित करितो. तोच आत्मा होय.

वृद्ध.

वृद्ध मनुष्यांना त्यांच्या सभोंवतालचें जग नेहमीं तरुणांनीं व्यापिलेलें दिसतें, व जनानें आपल्याला तरुण ह्मणावें ह्मणून ते नानातऱ्हेच्या युक्ति लढवीत असतात.

प्रकृति.

प्रकृतीला काल्पनिक असें कांहींच करितां येत नाहीं, किंवा रूपांतरही करितां येत नाहीं. ती केवळ प्रकृतिच आहे. ह्यापलीकडे कांहीं नाहीं. आतां, प्रकृतीचा प्रभाव नाहीं अशा कांहीं गोष्टी आहेत; परंतु त्या मानसिक.

आत्मा अमर आहे.

उष्णतेवांचून अग्नि असण्याची कल्पना करणें जितकें चुकीचें आहे, तितकेंच "आत्मा अमर नाहीं" असें ह्मणणें चुकीचें आहे.

रडगाणें.

अंतःकरणांत जरी दुःखाग्नीच्या ज्वाळा भडकत असल्या, तरी रड-गाणें गाणें ह्मणजे अगदीं वेडेपणा आहे. कारण, आपल्याविषयीं खरी कळकळ वाळगिणारा असा एकही प्राणी नाहीं. हें सर्व जग निर्दयतेनें भरलेलें आहे.

नवीन असें कांहींच नाहीं.

ह्या जगांत प्रत्येक वस्तु परिमाणूंनीं पुनः पुनः उत्पन्न होऊन पूर्ण झाली आहे, व पुनः पुनः स्मरणांतून नाहींशी झाली आहे. उत्पत्ति, स्थिति व लय हा जगाचा सारखा नियम चालणारच. या जगांत नवीन असें कांहींच नाहीं, व नवें कधीं होणारही नाहीं.

असें झालें असतें तर!

कोणीही सुज्ञ मागें गेलेल्या गोष्टींविषयीं विचार करीत नाहीं. "असें झालें असतें तर असें होतें," ह्या विचारांचें मनोराज्य चोहींकडून मृगजलानें व्यापिलेलें आहे. तो एका अतिशय दूर व अंधक स्थलाचा भास आहे. तेथें अश्रुरूपी ढग सदासर्वकाळ वर्षाव करीत असतात.

जगदुत्पत्ति.

जगाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत चालत आलेल्या प्रत्येक घडामोडीचा परस्परांशीं निकटसंबंध आहे. अर्थात्,

ती एक सांखळी आहे, असें ह्मटलें तरी चालेल. त्या सांखळीची प्रत्येक कडी दुसऱ्या कडीला निकट जोडलेली आहे. आतां ही सांखळी अस्तित्वांत कां असावी, हें मोठें गूढ आहे, आणि तें मुळींच सोडवितां येत नाहीं.

लबाडी.

खोटें बोलणें हें मुळीं वाईट; परंतु मुद्दाम लबाडीनें वागणें मात्र फार भयंकर. एवढ्या असत्य जगांत आह्मी रहातों कीं, येथें असत्य गोष्टी बाह्यात्कारीं मात्र सुरेखशा दाखविल्या जातात; आणि मोठ्या दुर्दैवाची गोष्ट ही कीं, कोणी कितीही जरी सत्यानें वागला, तरी कोणाचाच त्यावर विश्वास जडत नाहीं.

जगांतील रहस्यें.

मागें झालेल्या गोष्टी ह्मणजे चालू स्थितीचा एक भाग असतो, आणि पुढील भविष्य सुद्धां गुप्तपणें वास करीत असतें. एका मनुष्याच्या चरित्रांत जगांतील सर्व रहस्यांचा समावेश असतो, व प्रारंभापासून जर तीं सर्व कळलीं, तर जगाच्या उत्पत्तीचें कारण सहज शोधून काढितां येईल.

सृष्टीचीं सौंदर्यें.

सृष्टीचीं सौंदर्यें इतक्या निरनिराळ्या तऱ्हेचीं व सुखदायक आहेत कीं, जर प्रत्येकाला स्वर्गसुखाची प्रबल आशा नसती, तर जगांतल्या प्रत्येक वस्तूनें समाधान मिळालें असतें.

दुटप्पी स्वभाव.

मनुष्याचा दुटप्पी स्वभाव एखादा सत्यमार्ग दडपून ठेवण्यांत कदाचित् कांहीं वेळ यशस्वी होईल; परंतु अंतीं सत्याचाच जय होणार. ह्याकरितां प्रथमतः कोणत्याही एका गोष्टीविषयीं पूर्ण विचार करून ती पूर्णतेस नेण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. ह्मणजे त्याचा परिणाम फारच सुखावह होईल.

परमेश्वर.

तो सच्चिदानंद दीनवत्सल दयाळू परमात्मा कोणा एका तरी प्राण्याला जन्मभर दुःखांत ठेवील काय?—छे असें तो कधींही करणार नाहीं. दुःखाग्नीच्या प्रचंड होमांत आह्मांस सदा तडफडत पडलेले पाहून, त्याच्या प्रेमार्द्रांतःकरणाला फार दुःख होईल, कारण तो प्रेमानें पूर्ण भरलेला आहे, तो आह्मांशीं कधींही निर्दय होत नाहीं.

मन.

मन अगदीं स्वतंत्र आहे. परमेश्वरानें हें मनरूपी सुकाणूं मनुष्याच्या हातीं दिलें आहे. त्याच्या सहाय्यानें आयुष्यरूपी गलवत संसारसागरांतून पाहिजे तिकडे हांकारतां येतें. परमेश्वर आपणा स्वतःवर प्रेम करावयास किंवा सद्धर्मानें चालावयास कोणा एकासही लावणार नाहीं. ती इच्छा प्रत्येकानें स्वतःच केली पाहिजे. जगांतल्या सर्व गोष्टींपेक्षां हीच इच्छा विशेष आहे.

स्नेह.

स्नेह हा जर एखाद्या अयोग्य मनुष्याबरोबर जडला तर त्याचा लवकरच नाश होतो, व तो पुनः कधींही उत्पन्न

होत नाहीं. आणि अशीच स्थिति बहुतेकांची असते. मोठ्या दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ह्या आयुष्यरूपी वृक्षाला खरीं स्नेहरूपी पुष्पें क्वचितच येत असतात.

स्वतंत्र मन.

जर मनुष्य स्वतः एखाद्या वाईट कृत्यास लागला, तर त्यास कोणत्याही उपायानें चांगल्या स्थितींत आणितां येणार नाहीं. तसेंच जर त्यानें स्वतःच एखादें संकट ओढून घेतलें, तर परमेश्वरही त्याचें रक्षण करणार नाहीं. कारण, मनाची स्वतंत्रता ही प्राणिमात्रास दिलेली एक सबळ शक्ति आहे. तिच्या सहाय्यानें बऱ्यावाईटाविषयीं विचार करून आपल्या भावी स्थितीविषयीं प्रमाण बांधितां येतें.

एकांत-वास.

फक्त शुद्धाचरणाचे व निर्मलांतःकरणाचे लोक एकांतवासास योग्य आहेत. कारण एकांतवासांत रहाणें ह्मणजे परमेश्वराच्या अदृश्य दूतांच्या दृष्टीपुढें असणें. एकांत स्थल असें कोठें नाहींच. प्रत्येक स्थलाचा अणुरेणु चित्रगुप्ताच्या दूतांनीं व्यापिलेला आहे, व गुप्त स्थलीं केलेलीं कृष्णकारस्थानें ते कसे पहात आहेत, व टिपून ठेवीत आहेत, हेंही कोणा एकास कळत नाहीं; ह्मणून आपलें कृत्य कोणीं पाहिलें नाहीं असें कधीं ह्मणूंच नये.

तेजःपुंज तारा.

गगनमंडळावर दिसणाऱ्या असंख्यात सुखदायक तेजःपुंज तारा, जगच्चालकानें कां निर्माण केल्या असाव्या, हा प्रश्न जिज्ञासु जन त्यांच्याकडे अवलोकन करून प्राचीन

कालापासून आजपर्यंत करीत आले आहेत; परंतु अद्याप या प्रश्नाचें समर्पक उत्तर मिळत नाहीं, व विधात्याच्या अगाध चातुर्याचें रहस्य कोणाही प्राण्याला व्यक्त करितां येणार नाहीं. ह्या प्रश्नाचा विचार करूं लागलें कीं मति अगदीं कुंठित होते.

जो तो आपआपणाकरितां आहे.

"जो तो आपणा स्वतःकरितां आहे, दुसऱ्याकरितां कोणी नाहीं." जेव्हां स्वतःचेंच हित असतें, तेव्हां कोणीही धर्माच्या, व्यापाराच्या किंवा राजकीय बाबतींत सत्याकडे मुळींच लक्ष देत नाहीं. ह्या काळांत बहुतेक पुस्तकें व वर्तमानपत्रें द्रव्याच्याच लालसेनें लिहिलीं असतात.

जनभक्ति.

जनांची भक्ति खोट्यानाट्या गोष्टींवर फार असते. एखादी असत्य गोष्ट पसरावयाला एक मास देखील पुरता लागत नाहीं. परंतु सत्य गोष्ट प्रसिद्ध होण्यास बराच काळ जावा लागतो.

मनुष्यस्वभाव.

मनुष्यस्वभाव असा आहे कीं, प्रथमतः एखाद्या वस्तूविषयीं त्याच्या मनांत लोभ उत्पन्न होतो, नंतर तिच्या प्राप्तीची लालसा उत्पन्न होते, व एकदां ती प्राप्त झाली कीं तिचा त्यास कंटाळा येतो.

स्त्रियांच्या अनृत लीला.

बुद्धीला भ्रमवून टाकणाऱ्या व वीराला गुंग करणाऱ्या स्त्रियांच्या अनृत लीला ज्यांनीं आपल्या वयाचा कांहीं

काळ त्यांच्या सहवासांत घालविला आहे, त्यांना सहज कळून येतात.

**तर्कज्ञानी.**

स्त्रीजातीचे अवघे अल्प यत्न मागें टाकून आह्मीच तर्कज्ञानी आहोंत, अशी शेकी पुरुष मिरवीत असतात. परंतु दुर्गुण छपविण्याकरितां कोटिक्रम लढविण्याच्या ज्या कांहीं त्यांच्या विलक्षण तऱ्हा असतात, त्यांखेरीज मात्र कांहीं एक आश्चर्यकारक नसतें.

**समाजांतील काक.**

समाजांतल्या काकांना सत्याच्या मधुर गंधावर लोलुप होतां येत नाहीं. ते फक्त मुरदाड मांसाचीच घाण घेत असतात. त्यांच्या मतें एकही मनुष्य प्रामाणिक नसतो, किंवा एकही स्त्री पवित्र नसते. पवित्रता ही त्यांच्यापासून इतक्या दूर अंतरावर असते कीं, तिच्या अस्तित्वाची देखील त्यांना भ्रांतीच असते.

**वर्तमान स्थिति.**

काल काय झालें व उद्यां काय होणार, ह्याकडे मुलींच लक्ष देतां कामा नये. त्याचा सर्व भार नशीबावर टाकावा. मनुष्यांच्या दुःखाचें मुख्य कारण हेंच कीं ते मागें गेलेल्या व पुढें येणाऱ्या गोष्टींविषयीं चिंता वहात असतात. चालू स्थितीकडे मुलींच पहात नाहींत.

**गृहशिक्षण.**

स्त्रियांच्या आचरणाची भिस्त त्यांना बालपणीं मिळालेल्या गृहशिक्षणावर अवलंबून असते. एकदां त्या प्रौढ

झाल्यावर जरी भगीरथ यत्न केले, तरी बहुशा ते निर्फल होतात. वाईट खोड्या त्यांना जडतात परंतु त्यांचें कारण कांहीं कळत नाहीं. ज्या पुढें सद्गुणी निघतील ह्मणून फार आशा असते, त्याच कांहीं निराळ्याच दुर्गुणांनीं कवडीमोल बनतात. ह्मणून बालपणींच सावधगिरी घेतली पाहिजे.

बाह्य रोंख.

पुरुषांच्या अथवा स्त्रियांच्या बाह्य रूपावरून त्यांचें अंतस्थ स्वरूप जाणण्यासारखें दुसरें कांहींच मूर्खपणाचें नसेल. सोन्याची जरी सुरी असली तरी ती प्राणवृक्ष तोडितेच. कोकिल पक्ष्याला आपल्या पिसाऱ्याचा अभिमान बाळगिण्यासारखें कांहींच नसतें. परंतु त्याचें मधुर गायन मात्र इतर पक्ष्यांना लज्जा उत्पन्न करितें. केवळ मूर्ख लोकच वस्तूच्या अथवा मनुष्याच्या बाह्य स्वरूपावरून प्रमाण बांधितात.

धीर.

खरें व मान देण्यास योग्य कोणतें, ह्या संबंधानें ठाम मत होण्यास बराच काळ जावा लागतो. ज्यांना आपल्या ऐन तारुण्याच्या भरांत प्रजासत्ताक राज्य असावेंसें वाटतें, ते आपल्या प्रौढ वयांत राजपक्षाला जाऊन मिळतात. जे व्यवहारांत शिरतांच अनीश्वरवादी असतात, ते आपल्या मध्यवयाच्या सुमारास पारमार्थिक बनतात. ह्मणून कोणत्याही गोष्टीविषयीं धीर न धरितां, उतावळीनें मत ठरविणें केवळ दोषास कारणभूत आहे.

विलक्षण शक्ति.

सृष्टिनियमांप्रमाणें, वनस्पतींचीं वीजें, जेथें त्यांची चांगली वाढ होईल अशा स्थलीं हवेंतून जाऊन पडतात. त्याचप्रमाणें द्वेषाचीं अथवा प्रीतीचीं, दुःखाचीं अथवा आनंदाचीं वीजें मानवी अंतःकरणांत प्रेरणा करणारी एक विलक्षण शक्ति वातावरणांत भ्रमण करीत असते, ती जसे मनुष्याच्या अंतःकरणांत विचार चालले असतात, तशी मनोवृत्ति प्रगट करिते.

स्त्रीसौंदर्य.

एखादी वस्तु वाजारांतून विकत घेणें जितकें सुलभ आहे, तितकेंच स्त्रियांच्या सौंदर्याचा उपभोग घेणें सुलभ आहे. परंतु शुद्ध अंतःकरणाच्या व पतिव्रता स्त्रिया मात्र विकत मिळण्याजोग्या नसतात. त्यांचा लाभ क्वचितच पुरुषांच्या ललाटीं असतो. सौंदर्य जरी नाशवंत आहे, तरी पुरुषांना तें व्याधाच्या जाळ्याप्रमाणें गुंतवितें. त्याच्या योगानें पुरुषांची अक्कल नाहींशी होऊन ते अगदीं वेडे वनतात.

दैव.

ह्या नाशवंत सृष्टींत कोणी कितीही जरी निरुपद्रवी असला, तरी त्याला सुखानें दिवस कंठतां यावयाचे नाहींत. दैव अथवा नशीव कोणाही एका प्राण्याला सुख-वृक्षाच्या छायेखालीं फार वेळ वसूं देत नाहीं, कांहीं तरी अगदीं क्षुद्र कारण दृढ मैत्रीची अथवा सुखाची सांखळी मोडून टाकण्यास पुरे होतें; व जी शांतता चिरकाल टिकणारी अशी वाटते, ती समूळ नाहींशी होते.

म.नि. १११०

कोणी बोलत असतां सहज कानीं पडतें व तिकडे लक्ष जातें व आपलीच निंदा चाललेली आहे असें कधीं कधीं होतें. कारण त्यांत अशा निंदेखेरीज बहुशा चांगलें असें कांहींच नसतें. अशा ऐकण्यांत दोन प्रकारच्या सूचना मिळत असतात. एक ज्यांना मित्र असें समजत असतो अशा शत्रूविषयीं व दुसरी स्वतःच्या मोठेपणाविषयीं, अथवा शहाणपणाविषयीं जर एखादी पोकळ कल्पना असली, तर ती गळून पडण्याविषयीं. ह्मणून प्रत्येक गोष्टीकडे लक्ष देणें ह्यांतच शहाणपण आहे.

श्रवण.

---

प्रामाणिकपणा हा कुत्र्यांमध्यें सर्वसामान्य गुण आहे. परंतु मनुष्यांमध्यें तो विरळाच सांपडतो. कुत्रीं मनुष्यांवर प्रेम करितात, व प्रामाणिक रहातात. मनुष्यें इच्छित वस्तु प्राप्त होईपर्यंत प्रामाणिकपणा दाखवितात, व एकदा हेतु पूर्ण झाला कीं बैमान होतात. तरी सुद्धां आमचा जन्म श्रेष्ठ असा अभिमान बाळगितात. खरोखर जर जनांत सत्यता, प्रामाणिकपणा व भक्ति हे सद्गुण असतील, तर कुत्रीं श्रेष्ठ आहेत, आणि स्वार्थता, असत्य व दांभिकता, हे जर सद्गुण असतील, तर मात्र मनुष्यें श्रेष्ठ आहेत.

प्रामाणिकपणा.

---

जी जी ह्मणून गोष्ट घडते त्या प्रत्येकींत कांहींना कांहीं तरी अर्थ असतोच, व तिच्या योगानें आयुष्यरूपी शृंखलेला एक एक नवीन कडी जोडिली जाते. एखाद्या

अनुभविक गोष्ट.

वेळीं असें घडतें कीं, अमुक एक्या वेळीं अमुक एक्या मार्गानें चाललें असतां, ध्यानीं मनीं नसलेली अशी एखादी विपरीत गोष्ट घडून येते कीं, तिच्याविषयीं कल्पना देखील चालत नाहीं. अशी अनुभवानें मिळालेली प्रत्येक गोष्ट स्मरणांत ठेवून जर विचारानें वागलें, तर मरणकाळपर्यंत कुमार्गांत पाऊल पडण्याचा प्रसंग विरळाच येईल.

निद्रा.

निद्रा ह्मणजे दिवसभर काम करून श्रमलेल्या मनाला व शरिराला शांति देणारी विश्रांति. ह्या शांतिसुखाचा उपभोग मुलें व कावाडकष्टी जन ह्यांच्याशिवाय कोणा एकालाही मिळत नाहीं. कारण, रात्रंदिवस नानातऱ्हेच्या घोंटाळ्याचे विचार करणारे जे कोणी असतील, त्यांना एक तासही त्या स्वप्नरहित विश्रांतीचा लाभ घडत नाहीं. उत्तर रात्रीच्या सुमारास केवळ नांवाला त्यांना झोंप लागते, व अर्धवट जागृत व अर्धवट स्वप्नांत, असे ते असतात. वस्तुतः खरी झोंप त्यांस येत नाहीं.

आत्म-हत्या.

कोणालाही मरतां येईल, शेवटचा श्वास काढून टाकणें फार सोपें आहे, तें एखाद्या लहान मुलापासून तों वीरापर्यंत कोणालाही सहज साधितां येईल. एक क्षणिक दुःखाची वेदना झाली कीं झालें, आटपला इहलोकींचा वास. अंथरुणावर जाऊन पडणें जितकें सोपें आहे, तितकेंच तेंही आहे. अशा मरण्यांत मुळींच शूरत्व नाहीं. खरें शौर्य जगण्यांतच आहे. मृत्यु ह्मणजे फक्त चलनवल-

नादि व्यापार बंद करणें होय. जगाच्या सूत्रधारानें सूचना देण्यापूर्वीं संकटें व दुःखें ह्यांना भिऊन उतावळीनें व अज्ञानानें ह्या जगाच्या रंगभूमीवरून पळून जाणें ( आत्महत्या करणें ) केवळ भेकडपणा आहे. काम कसेंही वठो, परंतु आणिलेल्या सोंगाची बतावणी केली पाहिजे.

परमेश्वरी अंश.

प्रत्येक प्राणी जन्मास येतांना त्याच्या अंतःकरणांत परमेश्वराचा अंश असतो. त्यालाच आत्मा असें ह्मणतात. जर मनापासून यत्न केला तर त्या आत्म्याला चांगल्या स्थितींत नेतां येतें. मुलांस बाळपणापासून चांगल्या मार्गाकडे लावून शिक्षण दिल्यास तें जसें एखाद्या विद्येंत अथवा कलेंत निष्णात होऊन सद्गुणी निघतें, तद्वत् तो आत्मा इतक्या उच्चपदाला नेतां येतो कीं, त्याची कल्पना सुद्धां करितां येत नाहीं. मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं, ह्या भूगोलावरील अर्ध्याहून जास्त लोकांमध्यें हा आत्मा सदोदित अज्ञान स्थितींत असतो, तो कधींही विकास पावत नाहीं.

नशीब.

“ मी श्रीमान् झालों असतों! मी सन्माननीय झालों असतों! मी कीर्तिवान् झालों असतों तर”—अशी कल्पना करणें ह्मणजे किती बरें अज्ञान आहे! कोणत्याही मनुष्याच्या आंगांत ज्ञानाचें पूर्ण तेज जरी असलें, साधारण पुरुषापेक्षांही जरी त्याचे थोर विचार असले, तरी

एक दैव प्रतिकूल असलें, तर त्याच्या हातून काय होणार! दैवाच्या उलट जातां येईल असें कधीं कोणीं ह्मणूंच नये. कारण, तें अगदींच अशक्य आहे. कोणीं कितीही जरी भगीरथ प्रयत्न केले, तरी त्याला दैवाची प्रतिकूलता फिरवितां येणार नाहीं, किंवा सुदैवाला प्रतिकूल स्थितींत आणतां येणार नाहीं. जसें जसें प्राक्तनीं विधिलेखन असेल, तसें तसें घडणारच, तें कालत्रयीं चुकणार नाहीं.

स्वतःचें नव्हे.

या जगांत अशी कोणती वस्तु आहे कीं जिला स्वतःची ह्मणतां येईल? जें ज्ञान मनुष्यप्राण्यांस मिळालें आहे, ज्या श्वासोच्छ्वासावर प्राणिमात्रांचें जीवित्व अवलंबून आहे, जो जीवनरस रक्तवाहिन्यांतून सतत वहात आहे, हीं सर्व अतिश्रेष्ठ अशा व्यक्तीकडून उपयोगार्थ मिळालेलीं आहेत. तीं पुन्हा कधींनाकधीं तरी परत दिलींच पाहिजेत. कलाकौशल्याविषयीं जर विचार केला तर कवि, चित्रकलाभिज्ञ व संगीतकलाभिज्ञ, ह्यांचा चुकीचा समज आहे कीं, ते त्या कला स्वतःच्या ह्मणवितात. परंतु त्या कधींही त्यांच्या नव्हत्या, व त्यांच्या होणारही नाहींत. त्या सर्वसमर्थ अशा शक्तीकडून मिळाल्या आहेत. त्यांची योजना करण्याचें काम मात्र मनुष्यमात्राकडे आहे. एखाद्या सुरेखशा इमारतीची भिंत घोंटणाऱ्या गवंड्यानें, त्या इमारतीच्या रचनेचें चित्र आपणच स्वतःच्या कल्पनेनें तयार करून रंगविलें, असा वृथाभिमान बाळगणें जितकें उपहासास्पद आहे, तितकेंच कोणतीही वस्तु स्वतःची ह्मणणें हेंही आहे. कोणत्याही कामाची एकदां पूर्णता

झाली, कीं कर्त्याचा संबंध सुटला. मग ज्यांच्याकरितां तें केलें असतें, त्यांच्या स्वाधीन तें होतें, व लोकाभिरुचीस जर पात्र ठरलें, तर कालपरत्वें एकाकडून दुसऱ्याच्या हातीं जातें. ह्मणून स्वतःचें असें कांहींच नाहीं. स्वतःची वस्तु ह्मणजे जिचा कधींही वियोग होत नाहीं ती वस्तु होय.

ह्या जगांत अशीं कांहीं माणसें असतात कीं, त्यांना सदासर्वकाळ ज्ञान संपादण्यांतच परम सुख वाटतें. तीं जितकें जितकें अधिक शिकतात, तितकी तितकी त्यांची जिज्ञासा प्रबल होत जाते. कांहींजणांना एखादी गोष्ट पाहून अथवा ऐकून आश्चर्य वाटतें, व कांहींजणांना तींतील रहस्य जाणिल्यावांचून रहावतच नाहीं. ह्या होणाऱ्या सर्व भावना व्यर्थ आहेत, आणि जीविताची शाश्वति नसल्यामुळें शरिराबरोबर त्यांचाही लय होईल, अशी कल्पना करणें अगदीं चुकीचें आहे. कारण, जरी एखाद्या कवीची कल्पनाशक्ति व बुद्धिसामर्थ्य कितीही अलौकिक असलें, तरी त्याला आपले सर्व विचार प्रगट करितां येत नाहींत. त्याचे ते अर्धे प्रगल्भ विचार आंतल्याआंत मेंदूंत प्रदीप्त असतात. खरोखर मोठें आश्चर्य वाटतें कीं, जे लेखनद्वारें किंवा भाषणद्वारें प्रगट करितां येत नाहींत, असे विचार मेंदूंत तरी कां उद्भवतात, किंवा ह्या नाशवंत जगांतील कारागृहवास संपल्यानंतर पुढें कांहीं तरी करावयाचें आहे, ह्याची ही सूचना तर नसेल ना?

मूलांकुरांतले विचार.

सौख्य.

त्या अनंतकोटि विश्वपालकानें ह्या जगाचें रहाटगाडगें विनाकारण चालविलें आहे, असें मानणें केवळ अज्ञान आहे. तसेंच मनुष्याचा आत्मा, त्याच्या अगाध कल्पना, जागृतावस्थेंतील स्वप्नें, अनावर इच्छा, हीं सर्व नाशवंत मेंदूतील निरर्थक कल्पना आहेत, असें ह्मणणेंही शहाणपणाचें होणार नाहीं. ज्या अर्थीं अंतःकरणांत इच्छा उत्पन्न होते, त्या अर्थीं तिच्या पूर्णतेचेंही स्थल असलेंच पाहिजे. ह्मणून जर मृत्यूनंतर स्वर्ग किंवा मोक्ष नसता, तर त्याची कल्पना सुद्धां आली नसती. कारण, जी वस्तु नाहीं तिची कल्पना किंवा इच्छा तरी कशी होणार? जर एखाद्यास सांगितलें कीं, सर्पदंशापासून मनुष्य अमर होतो, तर तो कधींही ती इच्छा करणार नाहीं. कारण कीं, त्याचा मुळीं संभवच नाहीं. ह्मणून परमेश्वरानें ज्या स्थितींत ठेविलें असेल, तींत सौख्य मानून व त्याच्या ठायीं पूर्ण विश्वास ठेवून, सदाचरणानें कालक्रमण करावें. कारण, जर मृत्यूनंतर सुखाची उणीव भरून काढण्याकरितां एखादें स्थल नसतें, तर त्या प्रेमाब्धिपतीनें कोणत्याही प्राण्यास कधींच दुःखांत किंवा त्रासांत टाकिलें नसतें.

ईश्वरी लीला.

मानवी बुद्धिशक्तीला ईश्वरी लीला अगम्य आहे. ह्या विचारांत जरी सर्व आयुष्य खर्चिलें, तरी सुद्धां तींतील इंगित मुळींच समजणार नाहीं. भूमींत असलेल्या वनस्पतिबीजांत सूर्यकिरणें कशीं जातात व त्यांची वाढ कशी होते, हें कोणा एकासही सांगतां येणार नाहीं. तसेंच तीं जलतुषाराला व वालुकाकणाला तेजःपुंज मोत्यांचें व हि-

ज्यांचें रूप कशीं देतात हेंही जाणतां येणार नाहीं. सृष्ट वस्तूंच्या साधारण गोष्टींचा सुद्धां कोणा एकासही शोध काढितां येत नाहीं, मग ज्या हृदयांत त्रिभुवनें व्यापिलीं आहेत, तें विराटस्वरूप मानवी बुद्धिशक्तीला कसें कळणार? ब्रह्मांडनायकानें जगाची उत्पत्ति केली. आतां त्याच्या मनांत जर प्रत्यक्ष अस्थिमांसाचें स्वरूप धारण करून एखाद्या साध्वीच्या पोटीं जन्म घेण्याचें आलें, तर तसें करण्यास तो पूर्ण समर्थ आहे. आतां सर्व दिशांकडे दिसणाऱ्या अद्भुत चमत्काराविषयीं जर विचार केला, तर सर्व प्राणी अद्भुत आहेत. अद्भुतांतच ते रहातात. हें सर्व जग अद्भुत आहे. तें आपल्या नियमाप्रमाणें चालत आहे, तें कोणाची पर्वा करीत नाहीं. ह्मणून प्रत्येकानें साधुपुरुषांनीं लावून दिलेल्या सन्मार्गानें जावें, सत्याचा शोध करावा, आणि त्या सत्यानें जर त्याची टाळाटाळी केली तर, त्यास दोष देऊं नये. ज्या मूर्खत्वाला तें जाणतां येत नाहीं, त्यालाच दोष द्यावा.

ईश्वरी सामर्थ्य.

हें ईश्वरी सामर्थ्य कसें व कोठें आहे, असा जर कोणीं प्रश्न केला तर ज्या नियमावर प्राणिमात्रांचें जीवित्व अवलंबून आहे, जीं सृष्टसौंदर्यें चोहींकडे सारखीं पसरलीं आहेत त्यांत त्याचें स्वरूप स्पष्टपणें दृष्टिगोचर होत आहे. तसेंच अंतरिक्षांत दिसणाऱ्या भ्रांतिकृत चमत्कारांत, व महासागरांतील अप्रतिम वैभवांत ढळढळीत दृष्टोत्पत्तीस येत आहे. ज्यांनीं आपला सर्व जन्म शहरांत घालविलेला असतो, त्यांचीं मनें थोडींबहुत आकुंचित झालेलीं असतात, कारण शहरांत राहिल्यानें वनश्रीचे देखावे, लहान मोठे

पर्वत, सरोवरें, गगनचुंबित वृक्ष क्वचितच त्यांच्या दृष्टीस पडतात. परंतु शहर ह्मणजे मानवी कलाचातुर्याचें फल; त्याच्या रचनेंत विधात्यानें कांहीं आपला हात घातलेला नसतो, अशा ठिकाणीं राहिल्यामुळें कदाचित् तें कळणार नाहीं, परंतु वनप्रदेशाकडे थोडीशी दृष्टि फिरविल्यावर तत्क्षणींच तें दिसून येईल.

---

मुक्ति. वृंदारकाच्या अघटित घटनेचा मोठा चमत्कार वाटतो, व जगांत ही घडामोड कां असावी ह्मणून विचारतरंगाच्या सृष्टींत मन वाटेल तसें भ्रमण करीत असतें. स्त्रीपुरुषांचे थव्यांचे थवे इकडून तिकडे सैरावैरा जातांयेतांना दृष्टीस पडतात. कोणी घरें दारें बांधीत असतो, कोणी कल्पनासागरांत विहार करीत असतो, कोणी नानातऱ्हेच्या युक्त्या लढविण्यांत गर्क असतो, कोणी नानातऱ्हेच्या ग्रंथांच्या अध्ययनांत मग्न झालेला असतो, कोणी दुःखाग्नीच्या तापानें झुरणीस लागलेला असतो, कोणी शृंगारादि भाषणानें स्त्रियांचीं मनें वश करण्यांत गुंतलेला असतो, कोणी लग्नादि मंगलकार्याच्या प्रोत्साहनांत हर्षित झालेला असतो, कोणी धनसुतदारा ह्यांच्या मोहपाशांत गुरफटलेला असतो, अशा अनादिकालापासून चालत आलेल्या त्याच त्याच गोष्टी करण्यांत लोक गर्क असतात, हें पाहून मोठें नवल वाटतें. आणि जन्ममरणाचा फेरा सुद्धां त्याचप्रमाणें चाललेला असतो. शास्त्रवेत्ते ह्मणत असतात कीं "आह्मी पुढें जात आहोंत, आमची प्रगति होत आहे" परंतु तें पुढें जाणें कोठें हेंच मुळीं कळत नाहीं. कारण आयुष्यांतील मुख्य कर्तव्य

ह्मणजे आत्म्याला ह्या जडदेहरूपी कारागृहाच्या फेऱ्यांतून मुक्त करणें, त्यावांचून जन्म निरर्थक व निष्फळ आहे.

स्त्रीमोह.

प्रथमतः पुरुष स्त्रियांच्या अंतरस्थ स्थितीकडे लक्ष देत नसतात. केवळ त्यांच्या बाह्यस्वरूपाला भुलून फसतात. कारण, स्वरूपानें साधारण अशा सदाचरणी गुणसंपन्न स्त्रीला पसंत करून तिच्याशीं कोण लग्न लावितो? आणखी सुदैवानें एखाद्या भाग्यशाली प्राण्यानें जर तिचा स्वीकार केला, तर लोक त्याची कुचेष्टा करितात. त्यांच्या मतें छानछबेली सुंदर मूढ बायको घरसंसाराला योग्य असते. ती आपल्या पतिराजांना आज्ञेंत ठेविते, लोकांची कुचेष्टा करिते, व दागिन्यांची फाजील शोभा नाहींशी होईपर्यंत नानातऱ्हेच्या अलंकारांनीं नटण्याथटण्यांत गर्क असते.

प्रेम.

प्रेम ही एक अलौकिक वस्तु आहे. त्याला रंग नको, रूप नको, कांहीं नको.. तें कोणावर कधीं व कसें जडेल हें सांगतांच येत नाहीं. तें सदासर्वदा अंध असतें. परमेश्वरानें ह्या प्रेमविकाराची भावना प्राणिमात्राच्या हृदयांत उत्पन्न केली आहे. हें प्रेम प्रामाणिकपणानें व शांतपणानें अपरमित असह्य संकटें व दुःखें दीर्घकाल सहन करितें. ह्या ईश्वरी प्रेमप्रवाहाचा उगम मानसिक व निरपेक्ष असतो. तो कधींही विषयाच्या किंवा मनोविकारांच्या स्वाधीन होत नाहीं.

पैसा.

पैसा काय करणार नाहीं? गर्विष्ठाला चरणीं लोटांगणें घालवील. हेकेखोर मनुष्यास ताटाखालच्या मांजराप्रमाणें करील. जनांकडून सुज्ञ ह्मणवून घेईल. ज्याचें मुखावलोकनही नको, त्याच्या चरणीं मस्तक घांसवील. कितीही जरी संकटें आलीं तरी पर्वा करणार नाहीं. आणि कमलदलावरील जलाप्रमाणें टिकणारी स्त्रियांची अशाश्वत प्रीति आपल्या आज्ञेंत ठेवील. त्याच्या तेजाला हें सर्व जग दास आहे.

वेडा.

सध्यां वेडा ह्या शब्दाची व्याख्या कांहीं विलक्षण तऱ्हेनेंच करीत असतात. कांहीं लोक जो कोणी बुद्धिवान् पुरुष आपले थोर विचार पूर्णतेस नेतां येतील ह्मणून कल्पना करीत असतो, जो महात्मा परहिताकरितां स्वतःच्या सुखांना फांटा देतो, जो योद्धा प्राण वांचविण्यासाठीं समरांगणावरून पळून न जातां, धारातीर्थीं प्राण अर्पितो, त्यास "वेडा" असें समजतात. त्यांच्या मतें जो सौदागर जनाला युक्तीनें फसवून द्रव्याच्या राशी घालतो, तो मात्र "शहाणा" असतो.

सदसद्विवेकबुद्धि.

सदसद्विवेकबुद्धि ह्मणजे बरें वाईट जाणणारी शक्ति. ज्याप्रमाणें हंस दुधामध्यें पाणी मिसळलें असतांही दूधच सेवन करितो, त्याप्रमाणें ईश्वरानें तिच्या आंगीं सामर्थ्य दिलें आहे. परंतु तिचा बरावाईट उपयोग करणें मात्र प्राणिमात्रावर अवलंबून आहे. सांप्रत

काळीं तिचा फारच वाईट तऱ्हेनें उपयोग होत आहे. प्रत्येक वेळीं तिचा उच्चार केला कीं आटपलें, मग ती गोष्ट खरी असो कीं खोटी असो. खरोखर काळाला जसें स्वरूप द्यावें तसा तो होतो. धर्मग्रंथावर विश्वास ठेवण्याचे दिवस निघून गेले. आतां प्रत्येकानें दिवस प्रमाणसिद्ध करून ठेविले आहेत. ज्याला त्याला प्रत्येक गोष्टींत, मग ती ऐहिक असो कीं पारमार्थिक असो, प्रमाण पाहिजे.

मंगल-नाम.

विश्रांति आणि आश्रय ह्यांचा जणूं कल्पवृक्ष अशा त्या दुरितविनाशक विश्वंभराच्या मंगल नामाचा ज्यांनीं मनोभावानें कधींही उच्चार केला नाहीं, ते सदासर्वकाळ संशयाच्या भोंवऱ्यांत गुंतलेले असतात. ते नानातऱ्हेच्या भयंकर विचारांनीं रात्रंदिवस तळमळत असतात. त्यांनीं केलेल्या दुष्ट कृत्यांची आठवण त्यांना पदोपदीं होऊन ते अस्वस्थ असतात. त्यांना आपल्या मोक्षाचा खरा मार्ग कळेपर्यंत ते दुःखदायक गोष्टीकडे नेणाऱ्या निरनिराळ्या दुष्ट विकारांच्या भक्ष्यस्थानीं पडतात. परंतु जेव्हां त्या निष्कलंक निर्गुण परमेश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास जडतो, तेव्हां तें मंगलनाम सर्व संसारतापनिवारण करून, शांतिसुखाचा लाभ घडवून देण्यास साधन आहे असें दिसून येतें, व योग्य वेळीं दुष्टांना महात्मे बनवितें.

पक्ष्यांचें मधुर गायन.

प्रातःकालीं शयनावरून उठून चोहींकडे पाहिलें, ह्मणजे वृक्षांतून मधुर ध्वनि निघत असतात. तंतुवाद्यांच्या मधुर स्वरासारखे निर्मल, गोड व मंजुळ असे असंख्यात शब्द ऐकूं येतात. आहाहा! परमेश्वरानें निर्माण केलेले ते सकुमार सुंदर पक्षी सकलवस्तुनियंत्या निष्कलंक परमेश्वराच्या अगाध लीलेचे प्रेमळ पवाडे निर्मळ भावानें गात असतात. ते आपलपोटेपणानें भरलेल्या मानवी प्राण्यांच्या शृंगारादि गायनापासून अगदीं भिन्न असतात. तें लहान पक्ष्यांचें प्रेमळ सुस्वर व सुलभ गायन कृतघ्न मनुष्यांना लज्जा नाहीं काय उत्पन्न करणार? भारद्वाजपक्षी आपल्या मादीबरोबर जितक्या प्रामाणिकपणानें रहातो, तितकीं मनुष्यें आपल्या वचनाला कधीं तरी जागृत असतात काय? त्या सहस्ररश्मि दिनमणीच्या तेजःपुंज प्रकाशाचे हिंवाळ्यांत, तसेंच नानातऱ्हेच्या सुगंधिक पुष्पांनीं भरलेल्या वसंतऋतूतील प्रातःकालीं, चक्रवाकपक्षी आपल्या प्रेमळ गायनानें जितके आभार दर्शवितो, त्याच्या शतांशाइतके तरी मनुष्यें त्या परमात्म्याचे आभार मानितात काय? छे! मुळींच नाहीं. त्यांचा जन्म ह्मणजे त्या विश्वनियंत्याला विसरून नीच द्रव्याच्या प्राप्तीकरितां परस्परांवर चढाओढ करण्यांत गुंतलेला असतो.

धर्मोपदेशक.

धर्मोपदेशकांची इतिकर्तव्यता ह्मणजे त्यांनीं जगाच्या दर्पणावर दृष्टि फेंकून आयुष्यांचीं प्रतिबिंबित झालेलीं सुखदुःखांचीं किरणें अवलोकन केलीं पाहिजेत. नंतर त्यांतील गूढार्थ जाणण्याकरितां विचार करून जगाच्या

कल्याणासाठीं परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे. व जगांतील आदिकर्तव्यें काय आहेत तीं आपणाहून अज्ञान अशा समाजांना समजावून सांगितलीं पाहिजेत. केवळ उदरंभरणार्थ साळ्याभोळ्या माणसांना खोट्यानाट्या गोष्टी सांगून वेळेचा दुरुपयोग करितां कामा नये.

गैरसमज.

अशा किती तरी दुर्दैवी प्राण्यांच्या जन्माचा ह्या अज्ञानाच्या प्रचंडाग्नीनें विध्वंस केला आहे. समजुतींत थोडासाच फरक परंतु जन्माचा नाश. एखाद्या अगदीं क्षुल्लक गैरसमजुतीनें, अशा किती तरी प्रेमळ व निकट संबंधाच्या अंतःकरणांतील दृढ प्रेमरज्जु, ज्याप्रमाणें कोष्टयाचें जाळें बालकांचा सुद्धां थोडासा स्पर्श लागला असतां तुटून पडतें, त्याप्रमाणें छिन्नविच्छिन्न झाले आहेत, व होत आहेत. ह्मणून कसलाही संशय मनांत ठेवूं नये. तो येतांच त्याची निवृत्ति करावी.

मित्र.

मित्र हा शब्द निर्धास्तपणें कोणाएकास तरी लावितां येईल काय? कारण, खरा मित्र ह्मणजे जो सुखदुःखाच्या वेळीं समान असून सहाय करणारा. असे मित्र क्वचितच सांपडतात. हें भूतल ह्मणजे युद्धाचें आंगण आहे. येथें शांतता अशी मुळींच नाहीं. प्रत्येक जण इतरांशीं भांडत असतो. सूर्य आकाशाबरोबर, वायू वनाबरोबर, प्रकाश अंधकाराबरोबर, आत्मा मृत्यूबरोबर, एकसारखा झुंझत आहे. संतुष्ट असा एकही पदार्थ नाहीं.

प्रथमदर्शनीं भास.

जर प्रथम दर्शनींच एखाद्याविषयीं स्वाभाविक तिटकारा उत्पन्न झाला, व तसें होणें कितीही जरी मूर्खत्वाचें वाटलें, तरी मनांत पूर्ण गांठ बांधिली पाहिजे कीं, उभयतांच्या स्वभावांत न पटणारें असें कांहीं तरी आहे, व तें निरंतर प्रतिरोधांत रहाणार. जरी यदा कदाचित् कांहीं वेळपर्यंत तो तिटकारा काढून टाकिला, व त्याच्याशीं दाट स्नेह जडविला, तरी, मागें पुढें तो दुणावतो. प्रथमतः येणाऱ्या तिटकाऱ्याचें कारण उघड कळून येतें. आणि कांहीं दिवस त्याच्याशीं मैत्री जडली असल्यामुळें परिणाम फारच वाईट होतो, ह्मणून नेहमीं सावध असावें.

मोहिनी.

थोर पुरुषांमध्यें सुद्धां कोठें तरी एखादें व्यंग असतेंच. स्त्रियांना पुरुष कसे घायाळ होतात, हें चांगलें कळतें. त्यांनीं एकदा दृष्टिशराचें संधान धरिलें कीं, पुरुषांचा निग्रह, लज्जा, भीड कोठल्या कोठें नाहींशी होते. स्त्रियांनीं आपणावर प्रेमदृष्टि फेंकावी, त्यांच्या अधरपल्लवांतील मधु प्राशन करावयास मिळावा ह्मणून पुरुष आपले प्राण देण्यास तत्पर असतात. त्यांच्याकरितां जरी एखादें पाप करण्याची पाळी आली, तरी ते जनापवादाकडे लक्ष देत नसतात. परंतु शेवटीं त्यांना आपल्या कुकर्मांचीं फळें भोगावीं लागतातच. एका कवीनें ह्मटलें आहे कीं "परनारी माता." तिच्या ठिकाणीं आसक्ति ठेवण्यासारखें दुसरें पातकच नाहीं.

स्त्रिया.

स्त्रियांचे स्वभाव निरनिराळ्या तऱ्हेचे असतात. परंतु प्रेमाच्या संबंधानें सर्व सारखेच असतात. अशी एखादी स्त्री पहा कीं, तिनें कधीं कोणावर अथवा कशावरही प्रीति केली नाहीं. आणि अशी जर स्त्री कोणी शोधून काढिली, तर मोठ्या चमत्कारिक गोष्टीचा शोध काढिल्याप्रमाणें होईल.

निरर्थक पदव्या.

निरर्थक पदव्या ह्मणजे समाजांचीं मनें आकर्षण करून घेण्याकरितां नांवाला जोडण्याच्या मृगजलासारख्या जाहिराती आहेत. जे लोक विद्यान्वित व कुलीन घराण्यांतले असतात, त्यांना ह्या पदव्यांचें मुळींच महत्व वाटत नाहीं. परंतु, ज्यांचा जन्म चांगल्या कुळांत झाला नाहीं, किंवा ज्यांना चांगलें शिक्षणही मिळालें नाहीं, ते ह्या निरर्थक पदव्यांना फार महत्व देतात. त्यांना एखादी "रावसाहेब, रावबहादूर" अशी पदवी मिळाल्यानंतर जर एखाद्या सभेंत जाण्याचा प्रसंग आला, तर त्यांच्या हातून अजागळपणाचें वर्तन झाल्यावांचून रहात नाहीं.

मुक्तिधामाची इच्छा.

ह्या सृष्टींत अशी एकही वस्तु नाहीं कीं जिचा कधींही भंग झाला नाहीं. आणि मनुष्याचा आत्मा हा इतक्या नश्वर वस्तूंनीं गुरफटलेला असतो कीं, तो सदासर्वदा एका विवंचनेंतून दुसऱ्या विवंचनेंत जात असतो, व उच्चत्वाच्या पूर्णतेसाठीं झटत असतो. मानवी प्रेमाची जर ईश्वरी प्रेमावरोबर तुलना केली, तर तें अगदीं कोतें व क्ष-

णैक आहे. अशाश्वत वस्तु शाश्वत वस्तूंचा भास देणाऱ्या आहेत. ह्मणून जर मुक्तिधामाची इच्छा असेल, तर ऐहिक सुखांच्या वासनांना हळू हळू फांटा देण्याच्या यत्नांत राहिलें पाहिजे.

---

नरजन्म.

ह्या चौऱ्यायशींच्या फेऱ्यांतून आत्म्याची सुटका करण्याकरितांच परमेश्वरानें मनुष्यजन्म दिला आहे. ह्मणून प्रत्येकानें दुष्ट व घातकी स्वभाव टाकून सदाचरणानें व सत्यानें पूर्ण होण्याचा यत्न करावा. केवळ निराश्रित व निर्बल लोकांना पायांखालीं तुडविण्याकरितां, किंवा स्वभावतःच रमणीय असणाऱ्या देखाव्यांचें निर्मूलन करण्याकरितां, हा नरजन्म आहे, असें मानूं नये. खरोखर मनुष्यजन्म हा चातुर्य व पशुत्व ह्यांच्या मिश्रणासारखा आहे. आपले इष्टमित्र, सोयरेधायरे दुर्गुणांच्या कर्दमानें भरलेले पाहून आपणही तो आंगावर ओतून घ्यावा काय? किंवा स्वच्छ रहावें? केवळ शरीरानें नव्हे, तर कौटिल्य, असत्य व द्वेष ह्या दुष्ट विकारांपासून मन निष्कलंक ठेवावें. कारण, आयुष्य हें घराच्या पडलेल्या छायेप्रमाणें आहे, त्याची शाश्वती मुळींच नाहीं. परंतु दुसरी अशी कांहीं एक वस्तु आहे कीं, ती चिरकाल टिकते. ती वस्तु ह्मणजे आत्मा. ज्या आत्म्याला वऱ्यावाईट कृत्याबद्दल "त्या न्यायाधिशापुढें" जाब द्यावा लागतो.

---

७ अहंपणा. मनुष्यास त्याच्या अंतःकरणांत असलेल्या अहंपणाशिवाय दुसरे शत्रु नाहींत. तोच दुसरे शत्रु उत्पन्न करितो. तो सर्व पापांचें मूळ आहे. साधुपुरुषांनीं जी एक ह्मण करून ठेविली आहे कीं, "नरकमूल अभिमान" ती अक्षरशः खरी आहे. मनुष्याचा अहंपणा त्यास त्याच्या ऊर्जित काळीं नाशास कारणीभूत होतो. नम्रतेनेंच स्वर्गीं जातां येतें.

गर्विष्ठमन. परमेश्वरानें ह्या गर्विष्ठ मनाला कोणतेंही बंधन न ठेवितां पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. आणि ह्मणूनच त्याच्या बऱ्यावाईट आचरणाबद्दल वाईटबरीं फळें त्यासच भोगावीं लागतात. ह्या गर्विष्ठ मनाचा अभिमान समूळ नाहींसा करून, परमेश्वराच्या चरणीं जर त्याला लीन केलें, व अनुताप पावून व हृदय कळवळून "हे देवाधिदेवा, तूं ज्या स्थितींत ठेवशील तींत मी सौख्य मानीन" अशी प्रार्थना केली तर तो दीनांचा वाली दयाळू परमात्मा, तत्क्षणींच आपल्या चरणकमलीं आश्रय देईल, व आत्मा स्वर्गीं पोंचेपर्यंत त्यास एका वैभवांतून दुसऱ्या वैभवांत नेत राहील. कांहीं लोक नम्रता ही गुलामगिरीप्रमाणें समजतात. परंतु, खरोखर ती फार थोर देणगी आहे. परमेश्वराची थोरवी कबूल केल्यानें मनुष्यांचा संबंध त्याच्याशीं निकट जडतो, व तीं सद्गुणांनीं अलंकृत होतात.

कीर्ति व संपत्ति ह्या दोन नश्वर वस्तूंकरितां मनुष्यें सर्व काळ परस्परांशीं अघोरपणें झुंझत असतात. परंतु

कीर्त्ति.

अंतीं पूर्ण संतोष असा एकालाही मिळत नसतो. एका दृष्टीनें पहातां कांहीं वेळ आनंद देण्यास तो शक्य होतो, परंतु अंतीं दुःखालाच कारण होतो. स्वतःला जिंकणें हेंच महायुद्ध आहे. त्याच्या प्रत्येक नवीन विजयप्राप्तींत पूर्ण समाधान, शांति व सौख्य मिळतें. जो योद्धा आपल्या मनोविकारांना जिंकण्यास सिद्ध असतो, त्याचें मानसिक धैर्य किंवा शौर्य कमी करण्यास दारिद्र, व्याधि किंवा दुर्दैव समर्थ होत नाहीं.

बाह्यरूप.

मनुष्यांच्या बाह्यरूपाकडे पाहिलें तर किती तरी शोचनीय स्थिति आढळून येते! कोणत्याही मनुष्याच्या गंभीर किंवा सुशील मुद्रेवरून त्याचें खरें स्वरूप कळत नसतें. मोठें आश्चर्य वाटतें कीं, कांहीं दुराचारी पुरुषांच्या मुद्रांवर साधुपणा, अति कृष्णकर्मी स्त्रियांच्या मुद्रांवर पातिव्रत्य, एखाद्या सद्गुणाच्या वस्त्रानें झांकलेले महादुर्गुण, बाह्य स्नेहरूपानें झांकलेला स्वार्थ, स्तुतींत व मधुर भाषणांत गुंडाळलेला द्वेष, विषारी वनस्पतींप्रमाणें वाढणारे प्रकार दिसून येतात. ह्मणून नेहमीं सावध असावें.

अविनाशी शक्ति.

पुष्कळ लोकांना अंतःकरणांत असलेल्या अविनाशी शक्तीच्या ( आत्म्याच्या ) अस्तित्वाचें मुळींच ज्ञान नसतें. परंतु, त्याच विशिष्ट शक्तीला सुधारणा ग्राह्य असते. मृत्यूनंतर निरर्थक होणारी ज्या बाह्य शरीराची अपरिमित चिंता

मनुष्यें वहात असतात, तीपेक्षां जर ती त्या मरणविरहित वस्तूविषयीं वाहिली, तर खरोखर सुफलदायक होईल.

बंधुप्रेम.

ज्यांनीं उच्च प्रतीच्या कलेमध्यें आपली प्रगति केली आहे, त्यांनीं आपल्या कलेंतील लोकांविषयीं बंधुप्रेम ठेविलें पाहिजे. शुद्धाचरणाच्या वस्त्रानें सदासर्वदा वेष्टित असलें पाहिजे. दया, क्षमा व शांति ह्यांनीं अंतःकरण पूर्ण ठेवून उदार असलें पाहिजे. परंतु, सध्या ह्यांच्या उलट स्थिति आढळते. कोण ही निकृष्टावस्था! ह्या सकलकलावृक्षाला अशीं पूर्णतेचीं पुष्पें क्वचितच येतात. तो सर्वभक्षकीटकांनीं व्यापिला आहे. ही आनंदी बंधुप्रीति आनंदांतून निघून असंतोषकारक झाली आहे. कवि—जे ह्या भूगोलावरील प्राण्यांना सत्यमार्ग दाखविणारे समजतात, त्यांपैकीं पुष्कळ मोठे अभिमानी, स्वार्थसाधु व कोत्या विचाराचे असतात, आणखी स्त्रीस्वभावाप्रमाणें एकमेकांचा द्वेष व तिरस्कार करितात. कादंबरीकार जे स्वतःला भूतदयेचे सागर ह्मणवितात, ते आपल्या ग्रंथांत जनाला ब्रह्मज्ञानाचा पाल्हाळ सांगून, आपल्या कलेंतील जनाविषयीं तिरस्कार दाखवितात. शास्त्रवेत्ते एकमेकांच्या कल्पना उलट करण्यांत समाधान पावत असतात. धर्मकटाचे लोक एकमेकांचे पंथ नाश करण्यास सदोदित प्रवृत्त असतात. असा चोहींकडे सारखा द्वेष, मत्सर व त्रास भरलेला आहे.

मोह.

मोह दोन प्रकारचे असतात. एक शारीरिक व दुसरा मानसिक. मानसिक मोहापेक्षां शारीरिक मोहच बहुधा मनाला गुंतवितो. वाघ जसा आपल्या मादीच्या मोहक बांध्याला, मखमालीसारख्या मृदु त्वचेला, व सुंदर नेत्रांला मोह पावून तिच्या भोंवतीं घिरट्या घालीत असतो, तशा दृष्टीला रूपवती दिसणाऱ्या स्त्रियांच्या रूपाला मोह पावून पुरुष त्यांच्या मागें भ्रमरासारखे लुब्ध होतात. आतां या नियमाला अपवादक अशा कांहीं व्यक्ति असतील. परंतु फारच थोड्या. मात्र कादंबरींत वर्णिल्या असतील. वस्तुतः खऱ्या नाहींत. कथानकांतील सत्य व असत्य गोष्टींवर कोणीही विश्वास ठेवीत नसतो. उदाहरणार्थ प्रत्यक्ष व्यक्तीच पाहिजे. खरोखर मनुष्याच्या जन्मचरित्राला जडलेल्या दुःखांपैकीं अल्पकालपर्यंत टिकणारा व बहुशा निर्मूलन होणारा शारीरिक मोह ही एक मोठी दुःखाची गोष्ट आहे. जेव्हां स्त्रीपुरुष आपले ज्ञानी विचार बाहेर टाकून एकमेकांच्या स्वरूपाला मोह पावून अविचार करितात, तेव्हां शेवटीं त्यांना त्याचा पश्चात्ताप होऊन जन्मभर दुःख करीत बसावें लागतें. ह्मणून प्रारंभापासूनच सावधगिरी बाळगिल्यास असला प्रसंग क्वचितच येईल.

अनाद्यंत, दिव्य स्थल.

सृष्टीचे अद्भुत चमत्कार व्यर्थ आहेत असें ह्मणतां येईल काय ? ज्यांचा कधींही उलगडा होणार नाहीं अशा गोष्टींचा विचार करण्याकरितां मनुष्याचें जीवित्व आहे काय ? स्वप्नांतच भंग होणारीं स्वप्नें पहाण्याकरितां, आधा-

रावांचून आशा जागृत करण्याकरितां, परमेश्वर नसतां त्याकडे धांव घेण्याकरितां, मनुष्यजन्म परमेश्वरानें दिला आहे काय ?—नाहीं मुळींच नाहीं. ह्या भूपृष्ठाच्या पलीकडे एक अनाद्यंत दिव्य स्थल आहे, तेथें सत्पुरुषांना जें कांहीं ह्या जगांत मिळत नाहीं तें मिळतें.

अर्भक-दृष्टि.

अर्भकांची दृष्टि सदोदित वर्तमान स्थितींत संतुष्ट असते. त्यांला भावी स्थितीचा मुळींच विचार नसतो, परंतु वयांत आल्यावर त्यांना भावी स्थितीची चिंता लागते, व त्यामुळें तीं नेहमीं दुःखी असतात.

स्वतंत्रता.

स्वतंत्रता ह्मणजे कांहीं तरी पोकळ कल्पना आणणारा शब्द आहे. कारण आयुष्यामध्यें स्वतंत्रता अशी कोठें आहे ? सर्वजण मायापाशानें सारखे बांधले गेले आहेत, व कोणत्या तरी तऱ्हेनें गुंतले आहेत. स्वतंत्रता कुठें मरणोत्तर असली तर असेल. वस्तुतः या जगांत कोठें नाहीं.

घरांतील नोकर.

घरांतील नोकराप्रमाणें गुप्त हेराला सुद्धां घरांतील सर्व वातम्या शोधून काढितां यावयाच्या नाहींत. कारण, नोकराला घरांतील व्यंगें माहीत असतात. त्याला घरांत येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येक गृहस्थाची योग्यता व नांव माहीत असतें, त्याला घरांत काय चाललें आहे हें चांगलें

कळतें. एखादा राजा जरी असला तरी त्याचें ज्ञान नोकराला पूर्णपणें कळतें, व त्याचें जर एखादें अकर्म असलें तर तो क्षणार्धांत तें जनांपुढें आणूं शकेल. खरोखर ज्यांना आपल्या नोकरांबरोबर सरळपणें चालतां येत नाहीं, त्यांचें कोणाएकाशींही पटणार नाहीं.

हास्यमुद्रा.

मंडळींत प्रत्येकानें आंतून दुःखानें करपलेल्या व बाहेरून आनंदित दिसणाऱ्या जनांप्रमाणें जरी अंतःकरणांत दुःखानळ भडकत असला तरी हास्यमुद्रा दाखवावी. नाहींपेक्षां सर्वांच्या तिरस्कारास पात्र होईल.

उपदेशकार.

उपदेशकारांनीं प्रथम जनसमूहाचीं मनें आकर्षण करून घेण्याच्या यत्नांत असावें, व ते स्वानंदानें श्रवण करण्यास उत्सुक असतात इतकें झाल्यावर परमेश्वराच्या सत्यतेच्या कथा कथन करण्यास प्रारंभ करावा. मात्र श्रोत्यांच्या दुर्मिळ समागमाचा फारच अल्पकाळ वास टिकणार आहे, हें जाणून केवळ समूहाकडून स्तुतिवचनपुष्पांची वृष्टि करून घेण्यापेक्षां समूहांना थोर विचाराच्या व पूर्णतेच्या शिखरावर नेण्याकरितां मिळालेल्या वेळेचा किती उपयोग झाला हें पाहणें त्यांचें आदिकर्तव्य आहे.

तृष्णा.

अखिल जगाला तृष्णेनें सारखें घेरलें आहे. ती कधींच तृप्त होत नसते. ती आप, वायु व भूमि ह्यांमधून एकसारखी शोध करीत असते, व सुवर्ण, रत्नें व महाल

प्राप्त करण्याकरितां अश्रांत यत्न करीत असते, व एकदा सर्व प्राप्त झाल्यावर स्वर्गाकडे आपलें निर्लज्ज तोंड करून ईश्वराला संबोधून ह्मणत असते कीं, "हे भगवन्, माझ्या इच्छा पूर्ण होण्यास हें जग असमर्थ आहे."

भरंवसा. ज्यांचा कशांतही भरंवसा नसतो, ते स्वप्नींही नसलेल्या भयंकर संकटाद्रीखालीं नाश पावतात. व जे परमेश्वराच्या ठिकाणीं भरंवसा ठेवून सदाचरणानें वागतात, ते सौख्याद्रीच्या शैलावर आरोहण होऊन सर्व संकटांतून मुक्त होतात.

दुःख. अंतल्या आंत दडपून असलेलें दुःख सहन करणें फारच कठिण असतें, आणि जेव्हां दुःखी माणसाला आपलें दुःख प्रगट करण्यास मार्ग मिळतो, तेव्हां तें अर्धें नाहींसें झाल्यासारखें होतें.

मृत्यु. मृत्यु ह्मणजे एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणें. जे परमेश्वराचे भक्त असतात, त्यांना मरणाचें मुळींच भय वाटत नसतें. ह्या अज्ञानसागरांतून निघून त्या सौख्यपदाला मिळण्याकरितां ते मृत्यूला फार अधीर झालेले असतात. परंतु, जे नास्तिक असतात, त्यांना दीर्घकाल जगावेंसें वाटतें व मृत्युसमयीं भीतीचे पर्वत त्यांच्या आंगावर कोसळून पडतात.

सुंदर चित्रें.

कवितेप्रमाणें सुंदर चित्रें मनाचें आकलन करितात. खरोखर मानवी प्राण्यांस आपण पशु नसून मनुष्यें आहोंत इतकें कळूं लागल्यावर तीं फ़ारच विलक्षण होतात. कोणी एखादी कल्पना योजून ती गद्य किंवा पद्यरूपानें गोंवून जनांत चिरस्थायी करून ठेवितो. दुसरा एखादा कांहीं रंग एकत्र मिसळून पटावर सुरेखसें चित्र रंगवितो, तें वर्षानुवर्ष संग्रहीं राहातें.

निरुपद्रव्यांचा नाश.

निरुपद्रव्यांचा नाश केल्यानें मनुष्यांस आल्हाद होईल काय? तसेंच मंजुळ शब्द करणाऱ्या बिचाऱ्या गरीब पक्ष्यांना पिंजऱ्यांत अडकवून, भक्ष्याकरितां गरीब प्राण्यांच्या सकुमार कंठावर शस्त्र ठेवीत नाहींत काय? पांथिकाचे श्रम परिहार करणाऱ्या शीतल वृक्षाचें ताडन करून सुगंधित पुष्पांचा त्यांच्या स्थानापासून वियोग करीत नाहींत काय? शिव! शिव!! ह्याप्रमाणें जगांत निरुपद्रव्यांचा एकसारखा नाश होत आहे.

स्त्रीचातुर्य.

एखाद्या स्त्रीनें जर एखादें असाधारण कृत्य आचरिलें, तर पुरुष तिची नानातऱ्हेनें निर्भत्सना करितात. खरोखर ज्या स्त्रीला विचारशक्ति असते, जिनें नाना ग्रंथ पारायण केले आहेत, जिला गृहशिक्षण चांगलें मिळालें आहे, ती जिच्या हृदयांत कधींही सुविचारतरंग उद्भवले नाहींत, किंवा जिला कसलेंही शिक्षण मिळालें नाहीं, तिच्यापेक्षां पातिव्रत्याची योग्यता व खरीं कर्तव्यें जाणण्यास विशेष

समर्थ असते. ती–विचारी स्त्री मृत्यु सर्व पाश तोडून शरिराचा कधीं नाश करील हें अनिश्चित आहे, असें जाणून ममता, क्षमा व दया ह्यांची किती अवश्यकता आहे, हें पूर्णपणें जाणून असते. तसेंच तिनें जर कधीं कोणावर प्रेम केलें, तर तिच्या प्रेमांत सुखाच्या आशेनें पतंगाप्रमाणें इकडून तिकडे भराऱ्या मारणाऱ्या क्षुद्र विकारांच्या स्त्रीपेक्षां अधिक दृढता व सत्यता असते.

दुष्ट माणसें.

सिंह नेहमीं आपली क्रूरताच प्रगट करितो. सर्प जरी लपलेला असला तरी फुसफुसण्यानें आपली सूचना देतो. बुभुक्षित लांडगा आपल्या किंकाळीनें रानांतून जाणाऱ्या प्रवाश्याला पळून जाण्याविषयीं सूचना देतो. परंतु माणसें आपल्या हेतूचा मुळींच सुगावा देत नाहींत. तीं सिंहापेक्षांही क्रूर आहेत. सर्पाहूनही विश्वासघातकी आहेत, व लांडग्याहून बुभुक्षित आहेत. तीं आपल्या बंधुवर्गाचे हात मोठ्या स्नेहपाशानें बांधून घेऊन अपरोक्ष त्यांना बद्ध करितात; व अनृत व मतलबी अंतःकरणावर हास्यमुद्रेचें आच्छादन घालितात.

नाशवंत प्रेम.

या नाशवंत जगांतील प्रेम हें जलतरंगांवर पडणाऱ्या चंद्रकिरणांप्रमाणें क्षणैक आहे. तें केव्हां जडेल व केव्हां लयास जाईल याची शाश्वतीच नाहीं. ह्मणून प्रत्येकानें त्या निर्गुण निर्विकल्पाच्या प्रेमाची भावना जागृत करावी. कारण तेवढ्याकरितांच त्या विकाराची भावना

परमेश्वरानें प्राणिमात्रांच्या हृदयांत निर्माण केली आहे. जग हें ग्रंथाप्रमाणें प्रत्येकापुढें उघडें ठेविलें आहे. ज्यानें त्यानें आपल्या बुद्ध्यनुसार त्यांतील रहस्य जाणावें. मनुष्यजन्म केवळ दुसऱ्यांना संकटसमयीं सहाय्य करण्याकरितां विधात्यानें दिला आहे. ह्या भवसागरांतून आयुष्यरूपी गलबत हृदयांत असलेल्या परमेश्वरी अंशाच्या वल्ह्यानें हांकारल्यास, तमोमयाच्या ठिकाणीं सर्व तेजोमय दिसेल.

तारुण्य.

तारुण्य प्राप्त झालें कीं, प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या चरित्राला प्रारंभ होतो. त्यापूर्वी आयुष्य ह्मणजे केवळ अनुकूल अथवा प्रतिकूल गोष्टींत घालविलेले दिवस असतात. त्या वेळांत मनुष्यें थोड्याशा उपयुक्त व पुष्कळशा निरर्थक गोष्टी शिकतात, आणि एकंदर जगाविषयीं अर्धवट जागृत, कांहीं आनंदित, कांहीं अनिश्चित व कांहींशी चमत्कारिक अशी त्यांची स्थिति असते. परंतु तारुण्य प्राप्त झाल्यावर सुखाच्या आशा एकदम उद्भवतात, व मनाची पूर्वस्थिति पालटते. मनोविकार कळूं लागतात, धारणाशक्ति येते, संसाराचें थोडें बहुत ज्ञान कळूं लागतें, आणि भावी स्थितीच्या मनोराज्यांत तीं आनंदगिरीच्या शिखरावर इतके उंच जाऊन आरोहण होतात कीं, त्यांना स्वर्ग अवघें एक बोट उरतें. परंतु शेवटीं तो क्षणैक मृगजलमोह विलयास जाऊन पुन्हां तीं ह्या अज्ञानसागरांत पडून बुचकळ्या खात असतात. खरोखर या जगांत चोहींकडे सारखा मूर्खपणा भरलेला आहे. ह्या मूर्खपणाच्या जाळ्यांतून जर सुटका

करून घ्यावयाची असेल, तर चिरसुखाच्या ठायीं पोंहचण्याचा यत्न करावा.

ईश्वरी माया.

ईश्वरी माया सर्व ठिकाणीं सारखी भरलेली आहे. ती वायूचें चलनवलन, प्रचंड लाटांचें उद्भवन, षड्ऋतूंचें रूपांतर, पुष्पांची उत्पत्ति, वनस्पतींची वाढ, सूर्यप्रकाशाची प्रज्वलितता, नक्षत्रांची चकाकी ह्या सर्वांवर आपली सत्ता चालवीत आहे. ती सर्व पापदुःख क्षालन करण्याकरितां दयारूप मेघानें चोहींकडे सारखी व्यापून राहिलेली आहे. तिनेंच नवग्रहांना वातावरणामध्यें लटकाविलें आहे, व जगाचा लय होईपर्यंत वक्रीभवन करण्यास आज्ञा केली आहे. अहाहा! असा तो ह्या पूर्णोत्पत्तीचा कर्ता बधिर, अंध, लहरी किंवा विलासी नाहीं. त्याला सार्वभौमपतीचें मरण जितकें मोठें अथवा लहान आहे, तितकेंच एखाद्या सकुमार पक्ष्याचें आहे. एखाद्या महा राष्ट्राचा ऱ्हास झालेला पाहून जितकें त्याचें हृदय कळवळेल, तितकेंच एखाद्या पुष्पाच्या नाशानें त्याला दुःख होईल. हजारों भक्तांच्या प्रेमभरित प्रार्थना जितक्या कोमलांतःकरणानें तो ऐकितो, तितकेंच बालकांचें सरळ भजन शांत चित्ताने ऐकितो. वर खालीं बाजूला चोहींकडे प्रत्येक वस्तूंत सूर्यापासून तों वाळुकणापर्यंत सारखा व्यापून राहिलेला आहे. तो आपल्या मायेचा कधीं तरी तिरस्कार करील काय? कारण तो तिरस्काराचाच स्वतः नाश करितो. खरोखर तो आपल्या ह्या उत्पत्तीवर फार प्रेम करीत आहे, आणि ज्याप्रमाणें प्रीति पूर्ण होण्यास तिला दया, क्षमा व सहनशीलता

लागते. तसा तो दयेनें, क्षमेनें व सहनशीलतेनें पूर्ण भरलेला आहे. अशा त्या सर्वव्यापी जगदीशाला विसरल्यानें कधीं तरी सौख्य होईल काय ?

